डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०-२५६९७३४१
०२०-२५६०११५३
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३४१
मोबाईल : ९८८१९०८०२०

**संदर्भ : रासेयो/२०७/२०१७** **अंत्यत तातडीचे** **दि. १३/१०/२०१७**

**प्रति**
**मा. प्राचार्य**
**रासेयो संलग्नीत सर्व महाविद्यालये**
**पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा**

**विषय : रासेयो विशेष शिबीर नियोजन**

**मा. महोदय/महोदया,**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत एकूण ४७९ महाविद्यालयांमध्ये ५५,६०० रासेयो स्वयंसेवकांच्या साहाय्याने राष्ट्रीय सेवा योजनेचे विविध उपक्रम वर्षभर राबवले जाणार आहेत. याचाच अविभाज्य भाग म्हणून प्रत्येक महाविद्यालयाने राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे ७ दिवशीय विशेष शिबिराचे आयोजन करणे अनिवार्य आहे. त्यानुसार यावर्षी प्रत्येक रासेयो एककाने ही ७ दिवशीय विशेष शिबिरे **दि. २५ ऑक्टोबर २०१७ ते २५ डिसेंबर २०१७** ह्या कालावधीत घेणे गरजेचे आहे. या विशेष शिबिरासाठीचे प्रत्येक रासेयो एककाकडून प्रस्ताव मागवण्यात येत आहेत. हे प्रस्ताव Online पद्धतीने मागवण्यात येत असून **दि. १३ ऑक्टोबर २०१७ ते २२ ऑक्टोबर २०१७** ह्या कालावधीत राष्ट्रीय सेवा योजना एककांनी Online प्रस्ताव सादर करणे गरजेचे आहे. ह्यासाठी **www.unipune.ac.in/bcud/login/nss/special camp proposal** लिंक उपलब्ध करून देण्यात येत आहे.


महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार ही विशेष शिबिरे घेताना जे उपक्रम घेणे गरजेचे आहे, त्याची मार्गदर्शक तत्त्वे पुन्हा एकदा सोबत जोडली आहेत. त्यातील निर्देशांचे काटेकोर पालन होणे अत्यंत आवश्यक आहे. त्या त्या रासेयो एककाने दत्तक घेतलेल्या गावामध्ये विशेष शिबिर आयोजित करतांना महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसारच किमान ३ वर्षे त्या गावात शिबिरे घेणे आवश्यक आहे. त्यांच्या निर्देशानुसार केवळ शिबिरापुरते त्या गावाशी मर्यादित न राहता वेगवेगळ्या माध्यमातून व उपक्रमांतून रासेयो एककाने वर्षभर त्या गावाशी आपले नाते तयार करणे गरजेचे आहे.

ज्या रासेयो एककांना **दि. २५ ऑक्टोबर २०१७ ते २५ डिसेंबर २०१७** या कालावधीत विशेष शिबिरे घेणे शक्य नाही त्यांनी प्रयत्नपूर्वक याच कालावधीत शिबिरे आयोजित करावीत. अपवादात्मक परिस्थितीमुळे हे शक्य नसल्यास त्यांनी **२५ डिसेंबर २०१७ ते १५ जानेवारी २०१८** या कालावधीत विशेष शिबिरे आयोजित करावीत, परंतु योग्य त्या कारणमीमांसेसह हे प्रस्तावही **दि. २२ ऑक्टोबर २०१७** पूर्वीच रासेयो कार्यालयास Online प्राप्त होणे गरजेचे आहे.

मागील वर्षी काही रासेयो एककांनी अगोदर जाहीर केलेल्या गावी व वेळापत्रकानुसार विशेष शिबिरे आयोजित केली नाहीत असे प्रत्यक्ष ठिकाणी गेल्यावर लक्षात आले आहे. अशा एककांवर मागील वर्षी जुजबी कार्यवाही करून सक्त ताकीद देण्यात आली होती. ह्यावर्षी आपणांस असे नम्र आवाहन करण्यात येत आहे की आपल्या महाविद्यालयातील रासेयो एककाने विद्यापीठ, केंद्रीय रासेयो विभाग व महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसारच व दत्तक घेतलेल्या गावी आणि रासेयो एककाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसारच विशेष शिबिरे घेणे क्रमप्राप्त राहील. अन्यथा अशा एककांवर विद्यापीठ अधिनियम व रासेयो निर्देशानुसार सक्त कारवाई अथवा कमीत कमी २ वर्षांसाठी एकक निलंबित केले जाईल असे आपण आपल्या रासेयो एककास व कार्यक्रम अधिकाऱ्यास निर्देशित करावे.

मागील वर्षात राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांकडून रासेयो एकक, त्यांची कार्यपद्धती, उपक्रमांतील सातत्याचा अभाव किंवा जुजबी शिबिरे घेण्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. अर्थात ह्या तक्रारी शिबिरे कालावधीनंतर प्राप्त झाल्याने याबाबतची शहानिशा करता येणे शक्य नव्हते. त्यामुळे या वर्षी विशेष शिबिरे कालावधीत अधिक काळजीपूर्वक रासेयो एककांच्या कार्यपद्धतीचे, उपक्रम आयोजनाचे व एकूणच शिबिरांचे निरीक्षण व मूल्यमापन केले जाईल, याचाही निर्देश रासेयो एककास करून द्यावा.

रासेयो एकक हे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी अभिमानाचे व सामाजिक उत्तरदायित्व शिकवणारे एक छोटे गुरूकुल आहे. याबाबतीत आपण सर्वांनी अधिक संवेदनशील होण्याची अधिक गरज आहे. त्यामुळे आपणास हे विनम्र आवाहन करण्यात येत आहे की आपल्या मार्गदर्शनाखाली रासेयो एककाची वाटचाल अधिक सक्षमपणे व्हावी आणि आपल्या अनुभवाचा, प्रशासन कौशल्याचा फायदा विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागास व आपल्या रासेयो एककातील रासेयो स्वयंसेवकांना व कार्यक्रम अधिकाऱ्यांनाही व्हावा. परिणामी भारतीय विद्यापीठांच्या रासेयो विभागांमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा वेगळा ठसा उमटवणे शक्य होईल. कळावे, ही विनंती.



**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**


सोबत: १. Online विशेष शिबिर प्रस्ताव मार्गदर्शिका
२. महाराष्ट्र शासन निर्देशीत नियमित कार्यक्रम व विशेष शिबिर कृती आराखडा
३. नियमित कार्यक्रम व विशेष शिबीर भेट नमुना
४. अहवाल नमुना
५. दत्तक गावाची माहिती नमुना

**User Manual for**

# *Savitribai Phule Pune University*

# NSS Online Application Fill Special Camp Proposal

**1) Go [http://bcud.unipune.ac.in/](http://bcud.unipune.ac.in/) and Click on following Link.**





**2) Click on following Link and Go to College Login.**




## 3) Enter College id and password and Login.





## 4) After Click on Main Menu and then click on last option NSS.




## 5) To fill Special camp Proposal click on ‘Special camp Proposal’





## 6) For new special camp proposal application



7)




Add Special Camp Information
College Name :
our test organization Test College Dummy College Addr: latur Tal: Pune (corporation Area) Dist: Pune
NSS College Code :
Regular Unit :
SF Unit :
0
NSS Special Camp Sanctioned Students :
150
Place of Camp :
shrirampur
District :
AHMEDNAGAR
SHRIRAMPUR
Time Period of Special camp (7 days) :
From Date :
13/10/2017
To Date :
19/10/2017
How to reach(Mention route) :
rahuri next to belapur
25
(Km)
Projects in the Camp :
1 :
first Projects in the Camp
2 :
second Projects in the Camp
3 :
third Proje
4 :
fourth Projects in the Camp
5 :
fifth Projects in the Camp
6 :
sixth Projects in the Camp
7 :
seventh Projects in the Camp
Enter district
Enter place for camp
Enter date of camp
Enter taluka
Mention route Form which travel
Distance in km from college to place of camp
Enter different project name you have arrange in camp. Mention Atleast 4 project names.

Strength of Special NSS Camp Att
Boys : 12
SC : 5
Other : 14
Girl : 10
ST : 45
Total : 22
Name of The Teachers :
1 : गुंडरे विशाल विशाल
2 : म्हैसधुणे विकास छगन
3 : गायकवाड सुनिता रघुनाथ
Name of Lady Teacher :
1 : गायकवाड सुनिता रघुनाथ
Enter number of boys
Sc no. of boys and girls
Enter no. of girls




## 8) For print




## 9) Final print

SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY

National Service Scheme

SPECIAL CAMPING PROGRAMME

A-00

| Camp Details | | | |
|---|---|---|---|
| Name Of The College | our test orgnization Test College Dummy College Addr: latur Tal: Pune (corporation Area) Dist: Pune | | |
| Regular Unit<br>SF Unit | 300<br>0 | NSS Special Camp Sanctioned Students | 300 |
| At Place of Camp | shrirampur | | |
| Taluka | SHRIRAMPUR | District | AHMEDNAGAR |
| Date From | 13/10/2017 | To | 19/10/2017 |
| How to Approach(Mention Root) | rahuri to belapur | Distance From The College | 25 |

| Projects in The Camp | |
|---|---|
| 1. | Projects in the Camp |
| 2. | Projects in the Camp |
| 3. | Projects in the Camp |
| 4. | Projects in the Camp |
| 5. | Projects in the Camp |
| 6. | Projects in the Camp |
| 7. | Projects in the Camp |

Lectures by Resource persons

| Sr.No. | Name | Date | Topics |
|---|---|---|---|
| 1 | xyz | 01/10/2017 | education |

Strength of NSS Camp Students

| Boys | Girl | SC | ST | Other | Total Strength |
|---|---|---|---|---|---|
| 10 | 10 | 5 | 5 | 10 | 20 |

| | |
|---|---|
| Name of Teachers | गुंडरे विशाल विशाल |
| | म्हैसपुणे विकास छगन |
| | गायकवाड सुनिता रघुनाथ |
| Name of Lady Teacher | गायकवाड सुनिता रघुनाथ |

Date :

Place :

NSS Programme Officer

Principal

SEAL

राष्ट्रीय सेवा योजना

**स्वयंसेवकांनी राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत करावयाचे समाज उपयोगी उपक्रम.**

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः रासेयो-२०१७/प्र.क्र.८४ /१७/साशि-७**

मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मुंबई -४०० ०३२.

दिनांक: २६ सप्टेंबर, २०१७.

वाचा :

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.रासेयो-२०१४/प्र.क्र.४२/१४/साशि-७, दिनांक ६ सप्टेंबर, २०१४.

**प्रस्तावना :**

राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांनी १२० तास समाज उपयोगी उपक्रमामध्ये सहभागी होणे अपेक्षित आहे. तथापि, कोणत्या उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग महत्वाचा आहे, याबाबत संदिग्धता दिसून येत होती. यास्तव मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचा कृती आाराखडा तयार करावा, अशा सूचना दिल्या. त्यानुसार राज्यस्तरावर कृती आराखडा तयार करण्यासाठी दि. ०५ मे, २०१७ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या बैठकीमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेने दत्तक गावांमध्ये ८० तासाचे योगदान देण्यासाठी काही मार्गदर्शक उपक्रम सूचित केले आहेत. हे समाजाभिमुख उपक्रम विद्यापीठांमध्ये राबविण्यासाठी सुसूत्रता यावी, यासाठी एक नियमावली तयार करावी, तसेच दत्तक गावांमध्ये नियोजनबद्व उपक्रम राबविण्यासाठी मार्गदर्शक तत्वे असावीत, ही बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

**विद्यापीठे व महाविद्यालयांसाठी निर्धारित उद्दिष्टे :-**

१) महाराष्ट्रात ३००० गावे दत्तक घेणे (मुनीजन, विद्यापीठ दत्तक गाव, आदर्श सांसद ग्राम योजनेसह)

२) दत्तक गावांमध्ये जुलै ते ऑगस्ट या कालखंडामध्ये शाळाबाह्य मुलांना शोधून शाळेत प्रवेशित करणे.

३) सप्टेंबरपर्यंत ३००० गावांमध्ये कुपोषित मुले शोधून जानेवारी पर्यंत, दत्तक गावातील “एकही मूल कुपोषित नाही” असे ग्रामपंचायतीमार्फत प्रमाणित करणे.

४) ३००० गावामधील प्रत्येक व्यक्तीचे आधारकार्ड असणे आवश्यक आहे, तसे जानेवारीमध्ये ग्रामपंचायतीमार्फत प्रमाणित करणे.

५) दत्तक गावामधील “१८ वर्षे वयावरील प्रत्येक युवकाचे नाव मतदार यादीत समाविष्ट आहे” असे तहसिलदाराकडून प्रमाणित करावे.

६) गॅसवरील सबसिडी सोडण्यासाठी जनजागृती करून, दत्तक गावामधील किमान एका व्यक्तीला प्रवृत्त करणे.

७) प्रत्येक महाविद्यालयाने ५ बंधारे / १००० मीटर सीसीटी/ १ तलाव स्वच्छ करणे / १ टायर बंधारा बांधणे.

८) प्रत्येक स्वयंसेवकाने एक वृक्ष लावून त्याचे संवर्धन करणे.

९) दत्तक गावातील प्रत्येक महिलेचे हिमोग्लोबीन तपासून सरासरीवर आणण्यासाठी प्रयत्न करणे.

१०) रासेयोमध्ये प्रवेश देतेवेळी शौचालय बांधलेले असल्याचे प्रमाणपत्र आवश्यक असून, बांधलेले नसल्यास त्या विद्यार्थ्याने एक वर्षाच्या आत शौचालय बांधणे बंधनकारक आहे.

११) गड किल्ले संवर्धन -ज्या महाविद्यालयाजवळ एखादा गड आहे अशा महाविद्यालयांसाठी

अ) गड स्वच्छता

ब) गडाच्या डोंगर उतारावर सी.सी.टी. तयार करणे.

क) सी.सी.टी.लगत वृक्षारोपण करणे.

ड) स्थानिक ग्रामस्थांना गडाच्या इतिहासासंदर्भात जागरूक करणे, मार्गदर्शक म्हणून तयार करणे.

इ) पर्यावरण पूरक पर्यटनाला या माध्यमातूल चालना देणे.

शासकीय अधिकारी, सामाजिक वनीकरण, वनखाते व महाविद्यालय यांच्या माध्यमातून हा प्रकल्प राबविणे.

**नियमित उपक्रमांची मार्गदर्शक तत्त्वे -**

**शहरी भागातील उपक्रम -**

१) स्वच्छता अभियान

२) प्लॅस्टिक निर्मूलन

३) ओला कचरा व सुका कचरा यांचे वर्गीकरण करुन गांडुळ खतासाठी प्रोत्साहित करणे.

४) गलिच्छ वस्त्यांमध्ये विद्यार्थ्यांचे आरोग्य व स्वच्छता याविषयी जनजागृती करणे.

५) मलेरिया, डेंग्यू, स्वाईन फ्लू याबाबत प्रचार व प्रसाराची मोहिम हाती घेणे.

६) रेल्वे स्टेशन, बस स्टॅण्ड, धार्मिक स्थळे, थोर पुरुषांचे पुतळे, तलाव दत्तक घेणे.

७) आपल्या शहराला स्मार्ट व्हिलेजच्या स्पर्धेत भाग घेण्यास प्रवृत्त करणे.

८) शहरी भागातील धार्मिक उत्सवाच्या दरम्यान व तद्‌नंतर स्वच्छता मोहिम राबविणे.

९) स्वच्छतेबाबत माहितीपट तयार करुन प्रचार व प्रसार करणे.

१०) ब्लू रिबन क्लब तयार करणे व त्यांच्यामार्फत शहरी भागातील नगरपालिका व महानगरपालिका यांना सचेत करणे.

**<u>ग्रामीण भागातील उपक्रम-</u>**

१) देवराई व वनराई यांची निर्मिती करणे.

२) गड किल्ले, ऐतिहासिक व पर्यटन स्थळांचे संवर्धन व सुशोभीकरण करणे.

३) वणवा मुक्त शिवार तयार करण्यासाठी प्रचार व प्रसार करणे.

४) हरित महामार्ग तयार करण्यासाठी वृक्षारोपण, सुशोभीकरण व जैव विविधता संधारण करणे आणि दत्तक रस्त्यावर अपघात होणार नाही यासाठी रस्ता सुरक्षा अभियान राबविणे.

५) पाण्याच्या स्त्रोताच्या विविध ठिकाणांची स्वच्छता करणे.

६) प्राथमिक शाळांची स्वच्छता, आरोग्य तपासणी, गोठा स्वच्छ ठेवण्याबाबत प्रचार व प्रसार करणे.

७) कंपोस्ट खत तयार करण्यास प्रवृत्त करणे.

८) सांडपाण्याचे व्यवस्थापन किंवा शोष खड्डे तयार करणे.

९) अवयवदान, नेत्रदान, रक्तदान यावर विशेष भर देणे.

**<u>स्वस्थ भारत अभियान-</u>**

१) आरोग्य पत्रक (Health Card) सर्वच घरांमध्ये असेल, याचे सर्वेक्षण करणे.

२) प्रत्येक कुटुंबांचे ३००० गावांचे १०० टक्के आरोग्य पत्रक तयार करणे.

३) ३००० गावांमध्ये कुपोषित बालक शोधून गाव कुपोषीत मुक्त करणे.

४) शासनाच्या विविध आरोग्य सेवा व सुविधांचा प्रचार व प्रसार करणे.

५) आरोग्य शिबिरे आयोजित करणे.

६) महिलांच्या आरोग्याबाबत उपक्रम राबविणे.

७) कर्करोगाविषयी जनजागृती करून प्रतिबंधात्मक उपाय करणे.

८) योगाचा प्रचार व प्रसार करणे.

९) तणावमुक्त जीवनशैली निर्माण करण्यासाठी योगा शिबिरे आयोजित करणे.

१०) शेतकरी आत्महत्या थांबविण्यासाठी मानसोपचार तज्ज्ञांद्वारे समुपदेशन करणे.

११) कृषी महाविद्यालयांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी पीक रचनेमध्ये बदल करणे तसेच दुय्यम जोड व्यवसाय सुरू करण्यास प्रवृत्त करणे.

१२) पशुधन व्यवसायासाठी प्रोत्साहित करणे इ. उपक्रमांद्वारे शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीत बदल करणे.

**<u>बेटी बचाओ बेटी पढाओ -</u>**

१) स्त्री भृण हत्या प्रतिबंध.

२) कन्या जन्मदर वाढविण्यासाठी प्रचार व प्रसार करणे.

३) पथनाट्य, पोस्टर, प्रदर्शन तसेच स्पर्धा आयोजित करणे.

४) मुलींच्या शिक्षणाबाबत सुविधा, त्याबाबतच्या शासनाच्या योजना याविषयी जनजागृती करणे.

५) दत्तक गावातील मुले शाळाबाह्य राहणार नाहीत याची खबरदारी घेणे.

६) शैक्षणिक सुविधा, स्कॉलरशिप, रोजगार, स्वयंसहायता बचत गट, कौशल्य विकास आधारित महिला बचत गटांना सक्षम करणे.

७) कौटुंबिक वातावरण व रोजगार यांचा मेळ घालत असताना मानसिक ताणतणाव नाहीसे करण्याबाबत समुपदेशन.

८) स्त्री पुरुष मैत्री या संकल्पनेवर अधिक जाणीवपुर्वक समुपदेशन करणे.

९) निर्भय कन्या योजनेअंतर्गत स्वसंरक्षणाच्या योजनांबाबत प्रशिक्षण घेणे.

१०) कौटुंबिक मूल्य संवर्धनासाठी व वृध्दीगत होण्यासाठी जाणीव निर्माण करणे.

**<u>डिजीधन-</u>**

१) संगणकीय साक्षरता निर्माण करणे.

२) डिजिटल साक्षरता निर्माण करण्यासाठी डिजिटल लॉकर तयार करणे.

३) भिम ॲपचा प्रचार व प्रसार करणे.

४) बँकेच्या सहकार्याने वित्तीय साक्षरता अभियानाअंतर्गत (विशाखा) कॅशलेस महाराष्ट्र स्वयंसेवक निर्माण करण्याकरिता अनुलोन संस्थेच्या माध्यमातून प्रशिक्षण आयोजित करणे.

५) जिल्हा अग्रणी बँकेच्या सहाय्याने प्रशिक्षण आयोजित करणे. यामध्ये केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचा समावेश करणे इ. (मुद्रा, स्टार्ट अप)

६) जिल्हा अग्रणी बँकेमार्फत डिजीधन योजना यशस्वी करण्याकरिता आर्थिक सहकार्य मिळविणे.

७) जनधन योजनेअंतर्गत सर्व नागरिकांचे बँकेत खाते उघडणे, त्याला आधारकार्ड लिंक करून के.वाय.सी. करणे, पंतप्रधान सुरक्षा विमा योजना, अटल पेन्शन योजना याबाबत प्रचार व प्रसार करणे व सहभागी करून घेणे.

**विशेष शिबिरातील उपक्रम -**

१) सन २०१७-१८ पासून एप्रिल व मे मध्ये सी.सी.टी. चे काम पूर्ण करावे व जून, जुलै किंवा ऑक्टोबर मध्ये वृक्ष लागवड करुन त्यांचे १०० टक्के संवर्धन होईल यासाठी आराखडा तयार करणे.

२) पाणी फाऊंडेशन सोबत किंवा त्यावर आधारित शिबिरे आयोजित करणे.

३) तालुक्यातील सर्व महाविद्यालयांनी एका ठिकाणी/ एका दत्तक गावामध्ये शिबिराचे आयोजन करुन साखळी पध्द्तीने निर्धारित उद्दिष्टे पूर्ण करावीत.

४) पाणी प्रश्नावर रासेयोतील मुलांनी व महाविद्यालयांनी काम करणे अपेक्षित आहे. सन २०१७-१८ मध्ये पाण्यासाठी शिबीरे घ्यावीत, शिबीरा दरम्यान सलग समपातळी चर (CCT) हे उपक्रम राबविणे बंधनकारक आहे. शिबिरा दरम्यान वनराई, गॅबीयन बंधारे, कोल्हापूर बंधारे, शोष खड्डे, पारस बाग, वृक्षारोपण इत्यादी उपक्रम राबवावेत.

५) वरील उपक्रम राबविताना शास्त्रीय पद्धतीचा वापर करावा. सर्व शिबिरे ७ दिवसांची असावीत. उद्घाटन सोहळा आणि समारोप आधीच्या व नंतरच्या दिवशी असावा.

६) विद्यापीठांनी आपल्या अधिनस्त महाविद्यालयांची शिबिरे एकाच कालावधीत आयोजित करावीत. उदा.दिवाळीची सुट्टी / नाताळची सुट्टी / उन्हाळी सुट्टी.

७) शिबिरामध्ये विद्यार्थ्यांची संख्या शासनाने वितरित केलेल्या संख्येएवढीच असणे बंधनकारक आहे.

८) एखाद्या महाविद्यालयामध्ये विद्यार्थी संख्या पूर्ण होत नसल्यास, जिल्हास्तरीय किंवा विद्यापीठस्तरीय शिबिरे आयोजित करण्याची जबाबदारी विभाग समन्वयक, जिल्हा समन्वयक आणि संचालक, रासेयो यांची राहील.

९) शिबिरामध्ये सहभागी असणाऱ्या सर्व स्वयंसेवकांचे प्रशिक्षण नियमित कार्यक्रमामध्ये अंतर्भूत करून, शिबीरपूर्व प्रशिक्षण घेण्याची जबाबदारी विभाग समन्वयक, जिल्हा समन्वयक व संचालक, रासेयो यांची राहील. प्रशिक्षणासाठी प्रशिक्षित व्यक्तींना आमंत्रित करणे आवश्यक आहे.

१०) जिल्हा व विद्यापीठस्तरीय शिबिरे ऑगस्ट ते सप्टेंबर या महिन्यात सुरु करावीत.

११) शासनाची मान्यता प्राप्त झाल्यास प्रत्येक तालुक्यात २०० मुलांचे ७ दिवसांचे शिबिर पाणी फाऊंडेशन / नाम यांच्या आर्थिक सहकार्याने राबविणे.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या उपक्रमाची योग्य रितीने अंमलबजावणी व्हावी, यासाठी ही नियमावली तयार करण्यात आली आहे.या आधारावर उपक्रम राबविले जावेत, असा राज्य शासनाने निर्णय घेतलेला आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०९२६१५५१५८४४०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( डॉ. अतुल साळुंके )**
राज्य संपर्क अधिकारी/ विशेष कार्य अधिकारी.

**प्रत,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
२. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
५. संचालक, उच्च शिक्षण, पुणे,
६. संचालक,तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई,
७. शिक्षण संचालक, शालेय शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
८. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई,
९. कुलगुरु / कुलसचिव, सर्व विद्यापीठे,
१०. कार्यक्रम सल्लागार, राष्ट्रीय सेवा योजना, भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय, युवक कार्य व क्रिडा विभाग, शास्त्री भवन, नवी दिल्ली,
११. संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (दूरदर्शन, आकाशवाणी, वृत्तपत्रे इत्यादींच्या माध्यमाद्वारे यथोचित प्रसिध्दी देण्यासाठी)
१२. क्षेत्रिय संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, विभागीय केंद्र, पुणे

१३. कार्यक्रम समन्वयक तथा संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, सर्व विद्यापीठे,
१४. पुरस्कार निवड समितीचे सदस्य,
१५. पुरस्कार प्राप्त कार्यक्रम अधिकारी व त्यांच्या महाविद्यालयांचे प्राचार्य,
१६. पुरस्कार प्राप्त विद्यार्थी,
१७. निवडनस्ती, साशि-७.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
# राष्ट्रीय सेवा योजना
# विशेष शिबिर दत्तक गांव माहिती फॉर्म
# सन 2017–2018

दिनांक:      /      /

१. महाविद्यालयाचे नांव : ..........................................................................................

२. रासेयो कार्यक्रम अधिकारी नांव ............................................ मो..........................................

३. विशेष शिबिराचे ठिकाण : ..............................तालुका.......................जिल्हा.......................

४. विशेष शिबिर दिनांक :........................................ ते .......................................... पर्यंत

५. महाविद्यालयापासून शिबिर ठिकाणाचे अंतर .................. कि.मी.

६. एकूण लोकसंख्या .............. पैकी स्त्रीसंख्या ................ पुरूष संख्या ..............................

७. दत्तक गावाचे एकूण क्षेत्रफळ .............. पैकी शेती लागवडीखालील क्षेत्र ..............................

८. दत्तक गावास पाणीपुरवठा होणारा स्त्रोत ...........................एकूण पाणीसाठा...........................

नळ असल्यास एकूण संख्या ............................ हातपंप संख्या ...........................................

९. दत्तक गावातील एकूण वृक्षांची संख्या (अंदाजे)......................................................................

१०. दत्तक गावांतील शैक्षणिक संस्थांची माहिती ............................................................................

एकूण प्राथ. शाळा.............. माध्यमिक शाळा............... महाविद्यालये .......................

११. दत्तक गावातील एकूण युवा लोकसंख्येपैकी साक्षरांची संख्या (महिला व पुरूष %) ...................

१२.दत्तक गावांतील ऐतिहासिक व धार्मिक स्थळांची माहिती (स्थापनावर्ष).................................

..........................................................................................................................................

१३. दत्तक गावातील जास्तीत जास्त लोकसंख्येच्या उपजीविकेचे साधन ...................................

१४. शिबिर काळात झालेल्या प्रत्यक्ष कामाची थोडक्यात माहिती ..................................................

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

१५. शिबिर काळात केलेल्या नाविण्यपूर्ण उपक्रमांची माहिती ........................................................

..........................................................................................................................................

१६. दत्तक गावांतील रुग्णालये......... अनाथआश्रम......... दत्तक गावाला मिळालेला पुरस्कार व वर्ष..................

रासेयो कार्यक्रम अधिकारी                                        रासेयो विभाग समन्वयक

रासेयो जिल्हा समन्वयक                                        मा. प्राचार्य

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
# राष्ट्रीय सेवा योजना
# विशेष शिबिर सदिच्छा भेट
# सन 2017–2018

दिनांक:      /      /

१. महाविद्यालयाचे नांव : ..........................................................................

२. रासेयो कार्यक्रम अधिकारी नांव .................................. मो.........................

३. विशेष शिबिराचे ठिकाण : ...................................................................

४. दिनांक :........................... ते ............................ पर्यंत

५. महाविद्यालयापासून शिबिर ठिकाणाचे अंतर ................. कि.मी.

६. सन. २०१७–१८ या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थ्यांचे मंजूर एककसंख्या ..................

७. नियमित ............... विद्यार्थी ........... विद्यार्थीनी.......... एकूण........................

८. नियमित विद्यार्थी वर्गवारीनुसार ST............ SC.............. Other................. Open.......................

९. विशेष शिबिर मंजूर संख्या ...... विद्यार्थी....... विद्यार्थीनी........एकूण ................

१०. विशेष शिबिर विद्यार्थी सहभाग वर्गवारीनुसार ST.......... SC.......... Other..........Open...........

११. विशेष शिबिर प्रत्यक्ष उपस्थिती

विद्यार्थी ............... विद्यार्थीनी............. एकूण ......................................

१२. शिबिरात झालेले प्रत्यक्ष काम.................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

१३. इतर नाविण्यपूर्ण उपक्रम .......................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

रासेयो कार्यक्रम अधिकारी — रासेयो विभाग समन्वयक

रासेयो जिल्हा समन्वयक — प्राचार्य

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
# राष्ट्रीय सेवा योजना
# नियमित अहवाल
# सन 2017–18

दिनांक: / /

१. महाविद्यालयाचे नांव : ..........................................................................

२. प्राचार्याचे नांव : ...................................................................................

३. कार्यक्रम अधिकाऱ्याचे नाव ......................................विषय ..................

४. सन २०१७–१८ या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थ्यांची मंजूर एककसंख्या ..........

५. नियमित विद्यार्थीसंख्या एकूण............... विद्यार्थी ............ विद्यार्थीनी...........

६. विशेष शिबिर मंजूर संख्या ....... विद्यार्थी........ विद्यार्थीनी.........एकूण ..........

७. नियमित विद्यार्थी वर्गवारीनुसार ST............. SC.............. Other.................. Open............

८. एकक मंजूरी पत्र .................. कार्यक्रम अधिकारी मान्यता .......................

९. कॅशबुक .............. जनरल लेजर ............. डेड स्टॉक रजिस्टर .............

१०. राष्ट्रीय सेवा योजना ऑफीस ................. आवक–जावक रजिस्टर ..........

११. नियमित कार्यक्रम अहवाल ................... फोटो ............... बातमी..........

१२. रक्तदात्यांची संख्या ......................... सोबत यादी जोडणे.

१३. वृक्षलागवड/बीजारोपण एकूण संख्या ..............................

१४. राष्ट्रीय सेवा योजना **Website** वापर करता काय? ......**Email ID**--------------------

१५. इतर नाविण्यपूर्ण उपक्रम / कार्यक्रम, कार्यशाळा

..........................................................................................................

१६. नॅक भेट व त्यासंबधीचा अहवाल ......................................................

सही
रासेयो कार्यक्रम अधिकारी

सही
रासेयो विभाग समन्वयक

सही
रासेयो जिल्हा समन्वयक

सही
रासेयो कार्यक्रम समन्वयक

# राष्ट्रीय सेवा योजना,
# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे
## — नियमित व शिबिर संक्षिप्त अहवाल नमुना —

महाविद्यालयाचा
रासेयो क्रमांक

उदा. A-1

१. महाविद्यालयाचे नाव व पत्ता ——————————————————————

२. प्राचार्यांचे नाव, फोन नं. ——————————————————————

३. कार्यक्रम अधिकारी नाव, फोन नं. ——————————————————

४. स्वयंसेवक संख्या (एकूण युनिट) —————— अक्षरी ——————

५. कार्यशाळा/शिबिर/व्याख्याने इत्यादी आयोजनात सहभागी शासकीय, निमशासकीय, स्वयंसेवी संस्था नांव व पत्ता, फोन नं. ————————————————

६. नियमित कार्यक्रम अहवाल ——————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

७. नियमित कार्यक्रम काम करतांनाचे ४ फोटो सोबत देणे अत्यावश्यक आहे.

८. विशेष शिबिराचे ठिकाण (तालुका, जिल्हासहीत) ————————————————

९. विशेष शिबिराची सहभागी स्वयंसेवक संख्या ———— दिनांक ——————ते ———————

१०. **विशेष शिबिरे अहवाल** ——————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

————————————————————————————————

- रक्तदान शिबिरे (नियमित  विशेष) एकूण सहभागी स्वयंसेवक संख्या ——————————
- हिमोग्लोबीन तपासणी एकूण सहभागी ——————— रक्तदान एकूण बोटल्स संख्या ———————
- वृक्षारोपण एकूण संख्या (नियमित  विशेष) ——————— एकूण बीजारोपण ————————
- या व्यतिरीक्त विशेष कार्यक्रम ————————————— सहभागी स्वयंसेवक ———————
- विशेष  शिबिरे काम करतांनाचे व काम पूर्ण झालेल्या बदलाचे ४ फोटो सोबत देणे अत्यावश्यक आहे.